स्वच्छ सर्वेक्षणामध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रकमेच्या विनियोगाबाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक, क्रमांकः स्वमअ-२०१९/प्र.क्र. ९४ /नवि-३४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

वाचा: शासन निर्णय,नगर विकास विभाग, क्रमांकः स्वमअ-२०१९/प्र.क्र. ९४ /नवि-३४ दि. २५ जुलै, २०१९

<u>शासन शुध्दीपत्रक :</u>

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये उच्चतत्तम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रकमेच्या विनियोगाची कार्यपध्दती संदर्भीय दिनांक २५ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील

"(ब) **प्रोत्साहन अनुदानातून घ्यावयाच्या कामांची मंजूरी** :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रकमेमधून अनुज्ञेय केलेली उपरोक्त कामांसाठी संबंधित प्राधिकाऱ्यांची आवश्य तांत्रिक मंजूरी घेऊन संबंधित जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजूरी घेणे बंधणकारक राहील."

या ऐवजी पुढील प्रमाणे वाचण्यात यावे.

"(ब) **प्रोत्साहन अनुदानातून घ्यावयाच्या कामांना जेथे आवश्यक आहे तेथे संबंधित प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी घेवून** या **शासन शुध्दीपत्रका सोबतच्या विवरणपत्रात** दर्शविल्यानुसार **प्रशासकीय मंजूरीचे अधिकार** संबंधित प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

प्रोत्साहन अनुदानाच्या बक्षिस रकमे मधून महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या मर्यादेत संबंधित बाबींवर खर्च करण्यात यावा. या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी. प्रदान करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च राज्य शासनाची पूर्व परवानगी न घेता केल्यास ती आर्थिक अनियमितता समजून संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल."

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१४२६२३०३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ajit Sahebrao Palwe

Digitally signed by Ajit Sahebrao Palwe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bcc5dbdaa52955626b8257f1105a8a62ddbd1337948a428b4e4c992e5d3bf423, cn=Ajit Sahebrao Palwe
Date: 2019.09.20 13:27:32 +05'30'

(अजित पालवे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (नगर विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव (नवि-२), यांचे स्वीय सहाय्यक
६. विभागीय आयुक्त, महसूल विभाग, (सर्व)
७. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, वरळी, मुंबई
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) मुंबई
१२. निवड नस्ती (नवि-३४)

शासन शुध्दीपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ २०१९/प्र.क्र. ९४/नवि-३४, दि. १८/९/२०१९

सोबतचे विवरणपत्र

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
(१)	<u>घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगीक पुढील कामे</u>:-				
	(i) घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या अनुषंगाने शहरांचे तयार करण्यात आलेले घनकचरा व्यस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाची (DPR) अंमलबजावणी करण्यासाठी उपलब्ध होणारे केंद्र व राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा या निधी मधून अनुज्ञेय राहील.	संपूर्ण अधिकार	-	-	स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचे मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयामधील कामां व्यतिरिक्त घनकचरा व्यवस्थापनाच्या इतर कामांसाठी खर्च करावयाचा असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(ii) घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगीक कामांची प्रचार प्रसिध्दी.	संपूर्ण अधिकार	संपूर्ण अधिकार	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** (१) अ व ब वर्ग नगरपरिषदा: **रू १० लक्ष** (२) क वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत: **रू ५ लक्ष**	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) अ व ब वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** क) क वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत: **रू ५ लक्ष** (२) विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही.

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
					(४) या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
(२)	**शहर ओडीएफ + /++ करण्याच्या अनुषंगाने कामे.**				
	(i) शहरातील ज्या कुटुंबांकडे जागा नाही अशा कुटुंबांसाठी आवश्यकतेनुसार सामुदायीक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	संपूर्ण अधिकार	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** **नगरपरिषद / नगरपंचायत** :- **रू १० लक्ष** रकमे पर्यत	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) नगरपरिषद व -नगरपंचायत॰ : **रू १० लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. **(३)** कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही. **(४)** या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(ii) शहरातील सार्वजनिक वर्दळींच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयांचे आवश्यकतेनुसार बांधकाम करण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	संपूर्ण अधिकार	**महानगरपालिका** : संपूर्ण अधिकार **नगरपरिषद / नगरपंचायत** :	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
				रू. १०लक्ष रकमे पर्यत	परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) नगरपरिषद व -नगरपंचायत॰ : **रू १० लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही. (४) या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(iii) शहरातील सामुदायीक व सार्वजनिक शौचालयांची देखभाल दुरूस्ती व या शौचालयांची काळजी घेण्यासाठी व्यक्ती अथवा संस्था (Care Taker) नियुक्ती करण्यासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	संपूर्ण अधिकार	**महानगरपालिका : रू. २० लक्ष** रकमे पर्यत **नगरपरिषद / नगरपंचायत** :- **रू ०५ लक्ष** रकमे पर्यत	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) नगरपरिषद व -नगरपंचायत॰ : **रू ०५ लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. **(३)** कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही. (४) या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
					शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(iv) शहरातील सेफ्टीक टँक साफ करण्यासाठी आवश्यक असेलेली व्हॅक्युम एमटिअर (Vacuum Emptier) यंत्रे खरेदी करण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	संपूर्ण अधिकार	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** **नगरपरिषद / नगरपंचायत** :- ज्या शहरांकडे एकही व्हॅक्युम एमटिअर नाही अशा शहरांना एक व्हॅक्युम एमटिअर खरेदी करता येईल.	(१) व्हॅक्युम एमटिअर (Vacuum Emptier) यंत्रांची खरेदी GeM पोर्टलवरून करण्यात यावी. (२) एका पेक्षा अधिक व्हॅक्युम एमटिअर (Vacuum Emptier) खरेदी करावयाची असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूर घेण्यात यावी.
	(v) शहरातील मैल्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्प (FSSM) राबविण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	--	--	(१) CEPT संस्थेच्या सहाय्याने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असावा. (२) सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. (३) राज्य शासना कडून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.
(३)	**<u>शहराचे सौंदर्यीकरणाची कामे</u>** .				
	(i) कचरा मुक्त शहराच्या संकल्पनेनुसार शहरातील विविध ठिकाणांचे कचऱ्याचे ढिग (GVP) काढून टाकल्यावर तेथील जागांचे सुशोभीकरण करणे.	संपूर्ण अधिकार	रु १०.१ ते २० लक्ष रकमेपर्यत	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** (१) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष**	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:-

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
				(२) -क॰ वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत: **रू ५ लक्ष**	अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** क) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू ५ लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही. **(४)** या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(ii) शहर हागणदारी मुक्त झाल्यानंतर शहरातील पूर्वीच्या हागणदारीच्या ठिकाणांचे (OD Spot) सुशोभीकरण करणे.	संपूर्ण अधिकार	रु ०५.१ ते २० लक्ष रकमेपर्यत	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** (१) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** (२) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू ५ लक्ष**	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** क) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू ५ लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही.

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
					(४) या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची कामे करावयाची असल्यास त्यास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी.
	(iii) राज्याच्या अमृतवन प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शहरामधील पर्यावरण पूरक हरित पट्टयांचा विकास.	राज्य शासन	-	--	(१) हरित पट्टयांचा विकास करण्यासाठी तयार केलेल्या प्रकल्प अहवालास राज्य शासनाची (राज्य अभियान संचालनालया मार्फत) मंजूरी घेण्यात यावी. **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही.
	(iv) शहरातील वॉटर बॉडीजचे सौंदर्यीकरण.	संपूर्ण अधिकार	रु १०.१ ते २० लक्ष रकमेपर्यत	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** **नगरपरिषद / नगरपंचायत** :- **रू १० लक्ष** रकमे पर्यत	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. ५० लक्ष** ब) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू २० लक्ष** क) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू १० लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही.
(४)	**स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहरांचे तारांकीत मानांकन यांच्या अनुषंगीक कामे.**				

अ.क्र.	अनुज्ञेय कामे	मंजूरीचे अधिकार			
		राज्य शासन	जिल्हाधिकारी	महानगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत	अटी व शर्ती
	स्वच्छ सर्वेक्षणांच्या व कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनाच्या अनुषंगाने आवश्यक कामे उदा. या कामांसाठी शहरास मदत करण्यासाठी संस्थेची / संस्थांची नियुक्ती करणे, प्रचार प्रसिध्दी इत्यादी कामे करण्यासाठी.	संपूर्ण अधिकार	रु ०५.१ ते २० लक्ष रकमेपर्यत	**महानगरपालिका : संपूर्ण अधिकार** (१) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** (२) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू ५ लक्ष**	(१) प्रोत्साहन अनुदानाच्या संपूर्ण बक्षिस रकमे मधून याबाबीसाठी खालील मर्यादेत खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे:- अ) महानगरपालिका: **रू. २० लक्ष** ब) -अ॰ व -ब॰ वर्ग नगर परिषदा: **रू १० लक्ष** क) -क॰ वर्ग नगरपरिषद व -नगरपंचायत॰: **रू ५ लक्ष** **(२)** विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (३) कामाचे तुकडे पाडून कामे करणे अनुज्ञेय नाही.
(५)	**देशातील व राज्यातील सर्वोच्च गुणानुक्रम** (Top Ranking) **शहरातील घनकचाऱ्‍ा व्यवस्थापनाची व इतर कामांची पहाणी करण्याकरीता** exposure visits **करण्यासाठी.**	संपूर्ण अधिकार	रु ०५.१ ते १० लक्ष रकमेपर्यत	रू. ०५ लक्ष रकमेपर्यत	(१) देशातील / राज्यातील सर्वोच्च गुणानुक्रम आलेल्या शहरांमधील कामांची पहाणी करण्यासाठी दौरे करता अनुज्ञेय राहतील.
(६)	**सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष योजना तयार करून शासनाच्या मान्यतेने त्याची अंमलबजावणी करणे.**	राज्य शासन	--	--	सफाई कर्मचाऱ्यांसाठी योजना तयार करून ती मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात यावी.